# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.05.2025** **वार:सोमवार**

1. कृषी विकासासाठी एक राष्ट्र, एक कृषी, एक संघ धोरणाची केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा
2. ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ राज्यात विविध ठिकाणी आयोजित तिरंगा यात्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद
3. सोलापूरमध्ये कारखान्याला लागलेल्या आगीत 8जणांचा मृत्यू आणि
4. येत्या आठवड्यात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा.

**शिवराजसिंह चौहान**

कृषी क्षेत्रासाठी काम करणारे संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार आणि सर्व संस्थांनी एकत्र येऊन मिशन पातळीवर काम करण्याची गरज आहे; असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नागपूरमध्ये सांगितलं. कृषी क्षेत्र आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी एक राष्ट्र - एक कृषी आणि एक संघ; म्हणून कृषी विभाग आता काम करेल, अशी घोषणाही चौहान यांनी केली. विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत शेतकाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना शिवराज सिंह चौहान म्हणाले......

**इस कार्यक्रम के बाद आपके साथ बैठकर महाराष्ट्र के कृषि के विकास का रोडमैप बनाएगी। जो अच्छे काम चल रहे हैं उनको आगे बढ़ाते हुए हम महाराष्ट्र के लिए विदर्भ के लिए और क्या बेहतर कर सकते हैं। आपको पता है सोलह हजार वैज्ञानिक है हमारे पास सोलह हजार वैज्ञानिक जिनके पास टैलेंट है, जो दिन रात शोध करते हैं लेकिन वैज्ञान वैज्ञानिक शोध करते हैं लैब में और किसान काम करता है, खेत में एक लैब में है एक लैंड पर लेकिन लैब और लैंड को कभी जोड़ ही नहीं गया। हमारी कोशिश है कि वैज्ञानिकों को किसानों से जोड़कर हम प्रयोगशाला और खेत को एक कर दें ताकि पूरा लाभ रिसर्च, शोध और अनुसंधान का मिले।**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलयुक्त शिवार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा चौहान यांनी गौरव केला. 2026 च्या अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसाचे 12 तास वीज देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे; त्याचबरोबर राज्यात 12 महिने विजेची उपलब्धता करू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीप्रश्न मार्गी लागावा, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यादृष्टीने नळगंगा-वैनगंगा प्रकल्पाचं काम यावर्षी सुरू करत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

**आयएमएफ**

आयएमएफ, अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं आपल्या अर्थसहाय्य योजनेच्या पुढच्या टप्प्यासाठी पाकिस्तानवर 11 नवीन अटी लादल्या आहेत, तसंच पाकिस्तानच्या भारताबरोबरच्या तणावपूर्ण संबंधांमुळे योजनेच्या आर्थिक, परराष्ट्र, आणि सुधारणा विषयक उद्दिष्टांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. या नवीन अटींमुळे, आयएमएफनं पाकिस्तानवर लादलेल्या अटींची संख्या आता पन्नास झाली आहे.

**तिरंगा यात्रा**

ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्य दलांच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. राज्यातही ठीकठिकाणी काढण्यात येत असलेल्या या तिरंगा यात्रांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं काल निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाग घेतला. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अंतर्गत निर्मित शस्त्रास्त्रांमुळं पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात आपण विजयश्री प्राप्त केली. या शस्त्रास्त्रांसाठी जगातून भारताकडे मागणी होत आहे, असं फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं…

**आपला जो वॉर डॉमिनन्स आहे या संपूर्ण युद्धामध्ये जो आपल्याला पाहायला मिळला ऑपरेशन मध्ये जो आपल्याला पाहायला मिळाला हा वर डॉमिनन्स आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अशा प्रकारच्या शस्त्रांमुळे आपण करू शकलो. दोन हजार चौदा साली जेव्हा देशाचे प्रधानमंत्री मेक इन इंडिया आत्मनिर्भर भारत म्हणायचे त्यावेळेस लोकांनी तो जुमला आहे असं म्हटलं. पण आज तो आत्मनिर्भर भारत आपण बघितला ते मेक इन इंडिया ची पॉवर आपण बघितली.**

नागपूरमध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात काल तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत 500 फूट लांबीचा तिरंगा ठेवण्यात आलेला होता. ही भाजपची राजकीय यात्रा नाही, सर्वजण भारतीय सैन्यासोबत आहेत. भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ आणि दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दाखवण्यासाठी, ही भव्य तिरंगा यात्रा आयोजित केली असल्याचं यावेळी बावनकुळे म्हणाले.

सांगली जिल्ह्यातील मिरजेतील शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकातून काल तिरंगा यात्रा काढण्यात आली. आमदार सुरेश खाडे यांच्यासह माजी सैनिक, एनसीसीचे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. शिराळा तालुक्यातही काल तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

जालना शहरात आयोजित तिरंगा यात्रेत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, नारायण कुचे आणि संतोष दानवे यांच्यासह माजी सैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

मुंबईतल्या पश्चिम उपनगरातून काल तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. बोरीवलीच्या कोरा केंद्र इथून सुरू झालेल्या या तिरंगा यात्रेत मोठ्या संख्येनं शिवसैनिक आणि नागरिक सहभागी झाले होते.

पुण्यातही काल संध्याकाळी केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री आणि खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. भारतीय जनता पक्षाचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. पावसाच्या सरींच्या साक्षीनं उपस्थित मान्यवरांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन भारत माता की जय आणि वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. यावेळी आपलं मनोगत व्यक्त करताना खासदार मुरलीधर मोहोळ म्हणाले....

**जवानांना आणि वीर सैनिकांना अभिवादन करण्यासाठी आजची ही अभिवादन यात्रा आहे. जगभरामध्ये सुद्धा दहशतवाद मोडून काढण्यासाठी जी आमची भूमिका होती, जी भारत सरकारने घेतलेली भूमिका होती. आमच्या सैन्याने केलेला जो पराक्रम होता. त्याला संपूर्ण देशभरामध्ये मान्यता मिळाली की दहशतवाद असा संपवावा लागतो.**

**इस्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था-इस्रोनं काल ईओएस - झिरो नाईन या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं, मात्र उड्डाणाच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाडामुळे ही मोहीम अयशस्वी झाल्याचं, इस्रोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी सांगितलं.

**राजभाषा**

राजभाषा विभाग हिंदी भाषेच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन केंद्र सरकारच्या राजभाषा विभागाच्या संयुक्त सचिव डॉ. मीनाक्षी जौली यांनी नुकतंच पुण्यात केलं. दि ऑटोमोटिव रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया म्हणजेच ARAI इथं आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय राजभाषा परिसंवादामध्ये त्या बोलत होत्या. वरिष्ठ हिंदी साहित्यकार डॉ. दामोदर खडसे यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**कृषि विद्यापीठ-परभणी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या 53 व्या वर्धापन दिनानिमित्त खरीप पीक परिसंवाद आणि कृषि प्रदर्शनाचं आयोजन काल करण्यात आलं होतं. अन्नप्रक्रिया उद्योगाचं केंद्र म्हणून परभणीला विकसित करायचं असून, यासाठी लागणारा कच्चा माल स्थानिक शेतकऱ्यांकडूनच घेतला जाईल असं पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी यावेळी सांगितलं.

**विशेष रेल्वे**

भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ म्हणजेच IRCTC नं छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज विशेष वारसा सहलीची घोषणा केली आहे. येत्या 9 जूनपासून ही विशेष रेल्वे सुरू होत आहे. या सहलीद्वारे राज्यातील विविध ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा असं आवाहन पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केलं आहे. अधिक माहितीसाठी www.irctctourism.com या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

**बौद्ध महासभा-धाराशिव**

बिहारमधील बौद्धगया इथलं महाबोधी बुद्ध विहार, बौद्ध धर्माच्या ताब्यात द्यावं यासाठी बी टी ऍक्ट 1949 रद्द करण्याची मागणी भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष आणि समता सैनिक दलाचे अध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर यांनी केली आहे. ते काल धाराशिव इथं आयोजित भारतीय बौद्ध महासभेच्या अधिवेशनात बोलत होते. यासंदर्भात 29 मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

**आंदोलन-सांगली**

अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या कर्नाटक सरकारच्या निर्णयाविरोधात विरोधात सर्वपक्षीय संघर्ष समितीच्यावतीनं सांगली-कोल्हापूर रस्त्यावरील अंकली टोलनाका इथं काल चक्काजाम आंदोलन करण्यात आलं. 2005 आणि 2019 मध्ये सांगली तसंच कोल्हापूर जिल्ह्यात महापुरानं मोठ नुकसान झालं होतं. याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय रद्द करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. येत्या 21 मे रोजी मुंबईत या संदर्भात बैठक होणार आहे.

**आगमृत्यू-सोलापूर**

सोलापुरमधल्या अक्कलकोट रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीमधील सेंट्रल टेक्सटाईल मिल टॉवेल कारखान्याला काल शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीनं घटनास्थळी आल्या. जवळपास पाच ते सहा तासानंतर आग आटोक्यात आली.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, गुजरात टायटन्सने काल दिल्ली कॅपिटल्सचा 10 गडी राखून पराभव केला. 200 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शनच्या नाबाद शतकाच्या आणि कर्णधार शुभमन गिलच्या 93 धावांच्या जोरावर गुजरातने हे आव्हान सहज पार केलं. तर काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने राजस्थान रॉयल्सचा दहा धावांनी पराभव केला.

**कृषी पंचनामे**

गेल्या दहा बारा दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या पावसामुळे 23 जिल्ह्यांमधील 23 हजार 331 हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून नुकसानाचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट परिसरात येत्या 25 मे पर्यंत तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. किनारपट्टीजवळ वादळी वातावरणाची शक्यता असल्यामुळे, या काळात मच्छिमारांनी खोल समुद्रात जाऊ नये, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.